20 DEC 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क'' (ग्यान) उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन. सोबत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, न्यायाधीश एम. ए. लव्हेकर, डॉ. संतोष शहा, डॉ. भारती पाटील, ॲड. अनुष्का कदम, ॲड. संजय पाटील.

# स्वातंत्र्यासाठी एकत्रित लढा दिल्यानेच भारतीय संस्कृती अबाधित

## प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांचे प्रतिपादन :शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

अमेरिकेमधील विविध प्रांत स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वतंत्ररित्या लढले आणि एकत्र आले. भारतातील विविध संस्थाने, महात्मा गांधीजी आणि इतर स्वातंत्र्य सैनिकांच्या हाकेला प्रतिसाद देत सर्व जातिधर्मातील लोकांनी एकत्र येऊन स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढा दिला. त्यामुळे भारताला आपली संस्कृती जपणे शक्य झाले. मात्र अमेरिकेवर ब्रिटिश संस्कृतीची छाप कायम आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी केले.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकॅडेमिक नेटवर्क'' (ग्यान) उपक्रमांतर्गत 'अंडरस्टँडिंग द अलॅकेशन ऑफ पॉवर अंडर द युनायटेड स्टेट्स अँड इंडियन कॉन्स्टिटयूशन: अ कम्पॅरेटिव्ह ॲनालिसीस'' या विषयावर ते बोलत होते. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात हा कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. 'अमेरिका व भारतीय संविधानाचे ,तुलनात्मक विश्लेषणावर डॉ. ब्राऊन आजपासून २० पर्यंत विचार मांडणार आहेत.

कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर यावेळी म्हणाले, अन्याय, अत्याचार, हिंसा आणि शोषणाविरुद्ध लढा देताना न्यायपालिकांनी महत्त्वपूर्ण अशी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, एमएचआरडी''द्वारे देशातील वीस निवडक विद्यापीठांना अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे 'ग्यान''सारखे विशेष उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविणे विद्यापीठांना शक्य होणार आहे.

विद्यापीठाच्या 'ग्यान'' उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी उपक्रमाची माहिती विशद केली. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी कायदे सल्लागार डॉ. संतोष शहा, डॉ. भारती पाटील, ॲड. अनुष्का कदम, ॲड. संजय पाटील तसेच विधी अधिविभाग व समाजशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांसमवेत मुंबई, चेन्नई, बिहार येथून आलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'ऐक्यामुळेच संस्कृतीचे संवर्धन'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'अमेरिकेमधील विविध प्रांत स्वातंत्र्य प्राप्तीसाठी स्वतंत्ररित्या लढले आणि नंतर एकत्र आले. भारतातील विविध संस्थाने, महात्मा गांधीजी आणि इतर स्वातंत्र्य सैनिकांच्या हाकेला प्रतिसाद देत या ठिकाणच्या सर्व जातिधर्मातील लोकांनी एकत्र येवून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढा दिला. त्यामुळे भारताला आपली संस्कृती जपणे शक्य झाले. मात्र अमेरिकेवर ब्रिटिश संस्कृतीची छाप कायम आहे', असे प्रतिपादन अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटीचे ज्येष्ठ विधिज्ञ प्रा. डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन यांनी येथे केले.




ग्यान उपक्रमांतर्गत व्याख्यानात बोलताना डॉ. मार्क डेव्हिड ब्राऊन

क्रेंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) उपक्रमांतर्गत अंडरस्टैंडिंग द अलॉकेशन ऑफ पॉवर अंडर द युनायटेड स्टेट्स अँड इंडियन कॉन्स्टिट्यूशन: अ कम्पॅरॅटिव्ह अॅनालिसीस या विषयावर प्रा.डॉ.ब्राऊन यांचे विशेष व्याख्यान विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या व्हर्चुअल क्लासरुममध्ये आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

प्रा. डॉ. ब्राऊन अमेरिका व भारतीय संविधानाचे तुलनात्मक विश्लेषण व्याख्यानांद्वारे करणार आहेत. उपक्रमाअंतर्गत ही सातवी कार्यशाळा विद्यापीठामध्ये आयोजित करण्यात आली आहे. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कोल्हापूर न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. लव्हेकर म्हणाले, अन्याय, अत्याचार, हिंसा आणि शोषणाविरुध्द लढा देताना न्यायपालिकांनी महत्वपूर्ण अशी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, एमएचआरडीद्वारे देशातील वीस निवडक विद्यापीठांना अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्यानसारखे विशेष उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविणे विद्यापीठांना शक्य होणार आहे.

विद्यापीठाच्या ग्यान या उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. के. कामत यांनी उपक्रमाची माहिती सांगितली. अभ्यासक्रम समन्वयक डॉ.व्ही.वाय.धुपदाळे यांनी स्वागत केले. कायदे सल्लागार डॉ. संतोष शहा, डॉ. भारती पाटील, अॅड. अनुष्का कदम, अॅड. संजय पाटील तसेच विधी अधिविभाग व समाजशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांसमवेत मुंबई, चेन्नई, बिहार येथून आलेल्या विद्यार्थ्यांची विशेष उपस्थिती होती.



20 DEC 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना शिक्षणासह सर्वच क्षेत्रांत संधी

## बाळासाहेब कामत : सामाजिक वंचितता केंद्रातर्फे विद्यापीठात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : 'दिव्यांग व्यक्तींना शिक्षणासह सर्वच क्षेत्रांत समान संधी उपलब्ध असून, त्यांनी त्यांचा लाभ घ्यावा,' असे आवाहन कोल्हापूर समाजकल्याण विभागाचे साहाय्यक आयुक्त बाळासाहेब कामत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र (ज्ञान स्रोत केंद्र) व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अंध विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी आयोजित विद्यापीठस्तरीय पाचदिवसीय कार्यशाळेच्या उद्‍घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

श्री. कामत म्हणाले, ''दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही पातळीवर केवळ शारीरिक व्यंगामुळे दुय्यम वागणूक दिली जाऊ नये, याकडे शासनाचा कटाक्ष आहे. किंबहुना, ते अन्य सर्वसाधारण व्यक्तींच्या तुलनेत इतर बाबतींत सरस असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर कोणाही दिव्यांग व्यक्तीने स्वतःला कमी न समजता पूर्ण क्षमतेने स्पर्धा परीक्षांसह विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवावा. शासन त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यास तत्पर आहे.'' त्यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कम्युनिटी-बेस्ड रिहॅबिलिटेशन या उपक्रमाची माहिती दिली.

डॉ. शिर्के यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी परीक्षा पद्धतीमध्ये त्यांना सुकर असे बदल करण्याचे प्रयत्न विद्यापीठ स्तरावर सुरू असल्याचे सांगितले. ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी परिचय करून दिला. अलमास पेंढारी यांनी सूत्रसंचालन केले. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
पुण्यनगरी

# प्राचीन कोल्हापूरबाबत विशेष व्याख्यान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, वेस्टर्न रिजनल सेंटर यांच्यामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये 'प्राचीन कोल्हापूर आणि परिसर' या विषयावर बुधवारी (दि. २० डिसेंबर) दुपारी ३.३० वाजता विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव व्याख्यान देणार असून, इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
पुढारी

# प्राचीन कोल्हापूर विषयावर विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च व पुणे येथील वेस्टर्न रिजनल सेंटर यांच्यामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात प्राचीन कोल्हापूर आणि परिसर' या विषयावर बुधवारी (दि. २०) दुपारी साडेतीन बाजता विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव व्याख्यान देणार असून इतिहास विभाग प्रमुख डॉ, नंदा पारेकर अध्यक्षस्थानी असतील. व्याख्यानास विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच इतिहासप्रेमी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
तरुण भारत

# विद्यापीठात प्राचिन कोल्हापूर विषयावर आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागात पुणे येथील इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, वेस्टर्न रिजनल सेंटरतर्फे 'प्राचिन कोल्हापूर आणि परिसर' या विषयावर बुधवार (२०) रोजी दुपारी ३.३० वाजता व्याख्यान आयोजित केले आहे. याप्रसंगी पुणे येथील बालमुकुंद लोहिया संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

## आज व्याख्यान

**कोल्हापूर :** इंडियन काउन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, वेस्टर्न रिजनल सेंटर (पुणे) यांच्यामार्फत शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात 'प्राचीन कोल्हापूर आणि परिसर' या विषयावर बुधवारी (ता.२०) दुपारी साडेतीन वाजता विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव व्याख्यान देणार आहेत. व्याख्यानाचा इतिहासाचे विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक तसेच इतिहासप्रेमी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
लोकमत

## विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : पुणे येथील श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यास केंद्रातील डॉ. मंजिरी भालेराव यांचे आज, बुधवारी दुपारी साडेतीन वाजता शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान होणार आहे. व्याख्यानाचा विषय 'प्राचीन कोल्हापूर आणि परिसर' असा आहे. इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, वेस्टर्न रिजनल सेंटर, पुणे यांच्यामार्फत हे व्याख्यान होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
पुढारी

# बेटी बचाओ अभियानाबाबत शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानां'तर्गत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील या उपक्रम समन्वयकांसाठी शुक्रवारी (दि. २२) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी साडेदहा वाजता होणाऱ्या या कार्यशाळेत अभियानांतर्गत समन्वयकांची भूमिका, त्याचबरोबर महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावयाच्या उपक्रमांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहे. तरी महाविद्यालयीन समन्वयकांनी कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

## शुक्रवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयकांसाठी शुक्रवारी (दि. २२) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी साडेदहा वाजता होणाऱ्या या कार्यशाळेत अभियानांतर्गत समन्वयकांची भूमिका, त्याचबरोबर महाविद्यालयीन स्तरावरील नियोजित उपक्रमांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तरी महाविद्यालयीन समन्वयकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन बेटी वचाओ अभियानाचे समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी केले आहे.

20 DEC 2017 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'बेटी बचाव'बाबत शुक्रवारी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बेटी बचाओ अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील या अभियानाच्या समन्वयकांसाठी शुक्रवारी (दि. २२) मानव्यशास्त्र सभागृहात एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. यात अभियानांतर्गत समन्वयकांची भूमिका, महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावयाच्या उपक्रमांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. महाविद्यालयीन समन्वयकांनी कार्यशाळेस सकाळी ९ वाजता उपस्थित राहून नोंदणी करावी, असे आवाहन बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी केले आहे.